दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/००५/२०१९
दि.२९/०१/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.निजामुद्दीन रफील चौधरी ................अपिलार्थी
ए-२०२, श्रीसाई धाम, लोधा रोड,
मदिना हॉटेल जवळ, मिरारोड (पूर्व).

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

## -: <u>विवेचन</u> :-

श्री.निजामुद्दीन रफील चौधरी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांचेकडे दि.१२/११/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) गुलाम अली इकबाल चौधरी, काशिमिरा, मुन्शी कंपाऊंड, मकसूद चाल, सुन्नी मस्जिद के सामने प्रभाग क्र.६ नालावाला रोड, इस व्यक्ति और इस पते पर प्रॉपर्टी टॅक्स की कॉपी और यह प्रॉपर्टी टॅक्स किस दिनांक से लगवायी गयी थी। इन सभी की जानकारी देने की कृपा करे।

**<u>अपिल दाखल करण्याची कारणे:-</u>**
माहिती अधिकार अंतर्गत कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१५/०१/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**<u>सुनावणीचा तपशिल:-</u>**
अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२९/०१/२०१९ रोजी दुपारी ०३.२० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/००६/२०१९ दि.२१/०१/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.१२/११/२०१८ रोजीच्या पत्रानुसार माहिती मिळालेली नाही.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-: **निर्णय** :-

१) जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.६ यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन द्यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (कर)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.निजामुद्दीन रफील चौधरी,
ए-२०२, श्रीसाई धाम, लोधा रोड,
मदिना हॉटेल जवळ, मिरारोड (पूर्व).

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

३) सहा.जनमाहिती अधिकारी तथा
कर निरिक्षक, प्रभाग क्र.६

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.